विभागाची वेबसाईट बनवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन ज्ञापन क्रमांकः E gov-२०१५/प्र.क्र.५०/का-१

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -३२
तारीख: २ फेब्रुवारी, २०१६.

शासन ज्ञापन :-

विभागाचे समक्रमांकाचे दि.२४/११/२०१५ चे ज्ञापन अधिक्रमित करण्यात येत आहे. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३/०९/२०११, माहिती व तंत्रज्ञान (साप्रवि)दि.२१/०६/२०१४ तसेच दि.२९/११/२०१३ च्या पत्रामधील तरतुदीनुसार महिला व बाल विकास विभागाचे संकेतस्थळ (वेबसाईट) बनवण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. समितीने सुचविल्यानुसार केंद्रशासनाच्या नियंत्रणाखालील NICSI या संस्थेने EMPANEL केलेल्या खाजगी संस्थांकडून निविदा मागविण्यात आल्या.त्यापैकी NICSI च्या दि.०९/०७/१५ च्या पत्रान्वये Net Creative mind Solution Pvt Ltd. या संस्थेची विभागाच्या वेबसाईट बनवण्यासाठी निवड करण्यात आली. सदर संस्थेच्या निवडीस शासनाच्या दि.१४/१०/२०१५ च्या NICSI ला अग्रेषित पत्रान्वये मान्यता देण्यात आली. सदर संस्थेचा Client Site वरील पुर्ण वेळ सपोर्ट न घेता त्याऐवजी २ वर्षाची Offsite AMC सेवा घेण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी NICSI या संस्थेने संकेतस्थळ (वेबसाईट) तयार करण्यासाठी एकुण रु.१५,५२,५६१ (अक्षरी पंधरा लाख बावन्न हजार पाचशे एकसष्ठ) इतक्या रकमेच्या संक्षिप्त देयकास खालील अटींच्या अधिन राहून या ज्ञापनान्वये शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१. यापुर्वी संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशिलवार देयकांचा तत्परतेने निपटारा करण्यात येईल.

२. या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

३. खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

४. या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची व्यक्तिगत जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

५. मासिक निधी विवरणपत्रानुसार या करीता निधी उपलब्ध आहे.

सदर धनादेश NICSI या संस्थेच्या नावे काढण्यात यावा.

प्रस्तूत खर्च विभागाच्या ई-गव्हर्नन्ससाठी मंजूर असलेल्या २२५१ सचिवालय सामाजिक सेवा (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्प, राज्य योजनांतर्गत योजना (०२)(०१) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी १७ संगणक खर्च (२२५१०८७५) अंतर्गत सन २०१५-१६ या वर्षी उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

सदर ज्ञापन हे वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७९७/व्यय-६ दि.२९/१२/२०१५ अन्वये व्यय शाखेने सदर खरेदी ही विहित पद्धतीचा अवलंब करुन करण्यास तसेच अनौपचारीक संदर्भ क्र. १३/१६ विनियम दि.०७/०१/२०१६ अन्वये विनियम शाखेने मान्यता दिली आहे. सदर ज्ञापन शासन पत्र संचालक,माहिती व तंत्रज्ञान विभाग यांच्या दि.२९/११/२०१३ च्या पत्रान्वये निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१२०२५४३७३० असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shobha Shivaji Matre

Digitally signed by Shobha Shivaji Matre
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4b7476a486c93b80cc49bd393941b7ba3ad61480745d3cc64b30a72b4607d767, cn=Shobha Shivaji Matre
Date: 2016.02.04 15:42:40 +05'30'

(शो.शि.मत्रे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई .
३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
४. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विकास विभाग,(कक्ष-३९) मंत्रालय मुंबई.
५. उप सचिव (श्री.चव्हाण/श्री.हजारी), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२
६. प्रधान सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. वरिष्ठ व्यवस्थापक, NICSI स्टेट सेंटर ११ वा मजला,नविन प्रशाससकीय भवन,मुंबई-३२.
८. सर्व कार्यासने,महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई.
९. अवर सचिव (रोखशाखा), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (कार्यासन-१) .